**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
PHONE : Director Office –( 0231)2609068 CAP Section – (0231)2609317/2609110 Website – www.unishivaji.ac.in, Email – cap@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६००४, महाराष्ट्र**
दुरध्वनी : संचालक कार्यालय-०२३१ २६०९०६८ मध्यवर्ती मूल्यमापन विभाग-०२३१ २६०९३१७/२६०९११० संकेतस्थळ – www.unishivaji.ac.in, ई-मेल आयडी - cap@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**Ref. No. SU/Exam/CAP/** 562 **Date : 30/11/2024**
02.12.2024

-: अत्यंत महत्वाचे व तातडीचे :-

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : ऑक्टो./नोव्हें.,२०२४ या हिवाळी सत्राच्या पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष परीक्षेच्या उत्तरपत्रिका महाविद्यालय स्तरावर मूल्यमापनाबाबतची कार्यपध्दती.**

**संदर्भ : या कार्यालयाचे Ref. No. SU/Exam/CAP/528, दि.२२/११/२०२४ रोजीचे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की, परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या शिफारशीस अनुसरून विद्यापरिषदेने पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांचे उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाज **फक्त ऑक्टो./नोव्हें.,२०२४ या हिवाळी सत्राकरीता** महाविद्यालयीन स्तरावर करण्यास मान्यता दिली असलेचे आपणांस उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार ज्या महाविद्यालयांमध्ये भाग- १ परीक्षेसाठी परीक्षा केंद्र व उत्तरपत्रिका मूल्यमापन केंद्र मंजूर आहे, अशा महाविद्यालयांनी फक्त बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी., बी. व्होक. सर्व अभ्यासक्रम, बी.बी.ए., बी.सी.ए. व बी.ए.बी.एड्. भाग- १ परीक्षेच्या उत्तरपत्रिका मूल्यमापन आपल्या महाविद्यालयात करावे.

तसेच सदर परीक्षेंच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या कार्यपध्दतीस विद्यापीठ अधिकार मंडळाची मान्यता प्राप्त झाली असून सोबतप्रमाणे सदरची कार्यपध्दती आपणांस पाठविण्यात येत आहे. सदरच्या कार्यपध्दतीनुसार पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या कार्यपध्दतीमध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमांच्या **फक्त ऑक्टो./नोव्हें.,२०२४ या हिवाळी सत्राच्या** प्रथम वर्ष परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालय स्तरावर करण्यात यावे.

तरी याची त्वरीत नोंद घेवून **सदरचे पत्र व कार्यपध्दती सर्व संबंधीतांच्या तात्काळ निदर्शनास आणावी, ही विनंती.**

**कळावे,**

आपला विश्वासू,
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत – माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

1. मा. कुलगुरु कार्यालय
2. मा. प्र-कुलगुरु कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालय
5. मा. वित्त व लेखा अधिकारी कार्यालय
6. परीक्षा विभागातील सर्व संबंधीत विभाग व सर्व अधिकारी
7. आय.टी.कक्ष
8. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
9. विद्यार्थी सुविधा केंद्र
10. इंटरनेट विभागास सदरचे पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी